जा.क्र.राजिप/साप्रवि/परिषद/५८०९/२०२६
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
दिनांक :-०८/०४/२०२६

प्रति,

१. खाते प्रमुख ...................... (सर्व)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

२. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ......................(सर्व)

**विषय :- दि.०६.०३.२०२६ रोजीच्या नियमित स्थायी समिती सभेचे इतिवृत्त पाठविणेबाबत.**

दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रशासक तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या दालनात घेण्यात आलेल्या नियमित स्थायी समिती सभेचे इतिवृत्त या पत्रासोबत जोडून सादर करण्यात येत आहे. सदर इतिवृत्तातील आपल्या विभागाशी संबंधित मुद्दावर योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

Pathare

**(जालिंदर पठारे)**
**सचिव स्थायी समिती, तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.),**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

प्रत :- मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

**रायगड जिल्हा परिषदेची प्रशासकीय स्थायी समितीची नियमित सभा शुक्रवार दिनांक ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात घेण्यात आली. त्या सभेचे इतिवृत्त.**

**भाग -1**

| अ.क्र | उपस्थितअधिकारी |
|---|---|
| १. | मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| २. | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप अलिबाग |
| ३. | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, रायगड-अलिबाग |
| ४. | सचिव प्रशासकीय स्थायी समिती तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र), रा.जि.पअलिबाग |
| ५. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| ६. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) रा.जि.प अलिबाग |
| ७. | कार्यकारी अभियंता (बांधकाम) रा.जि.प अलिबाग |
| ८. | जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालकल्याण, रा.जि.प, अलिबाग |
| ९. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, रा.जि.प, अलिबाग |
| १०. | जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प अलिबाग |
| ११. | शिक्षणाधिकारी (प्राथ) रा.जि.प अलिबाग |
| १२. | शिक्षणाधिकारी (माध्य) रा.जि.प अलिबाग |
| १३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) रा.जि.प.अलिबाग |
| १४ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी, रा.जि.प.अलिबाग |

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद म्हणाल्या की, आज शुक्रवार दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समितीच्या सभेस सभागृहात उपस्थित असलेले सर्व खाते प्रमुख, इतर विभागाचे अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग यांचे मन:पूर्वक स्वागत करते.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेचे सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) यांना विषय पत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात करणेबाबत सांगितले.

**विषय क्रमांक ०१ :- जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा.**

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा अहवाल वाचून दाखवला.

**विषय क्रमांक ०२ :- दि.०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, दि.०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास आजच्या सभेने मान्यता दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद म्हणाल्या की, दि.०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही - कार्यवाही नाही.**

**विषय क्रमांक ०३ :- विभाग निहाय आढावा**

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद म्हणाल्या की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक २०२६ चा निकाल जाहिर झाला असुन मा.जिल्हाधिकारी यांच्याकडील दि.२६.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, रायगडची मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुक नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे गुरूवार दि.१२.०३.२०२६ रोजी होणार आहे. तरी होणाऱ्या निवडणुक सभेबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, दि.१२.०३.२०२६ रोजी होणाऱ्या मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुक सभा दुपारी ०२.०० वाजता असली तरी, मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करणे सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वा. पर्यंत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे घेणार आहेत. व त्यानंतर दुपारी ०२.०० वाजता प्रत्येक्ष मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांची निवडणुकीचे कामकाज चालु होणार आहे.

मा.जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडील आदेश जा.क्र.साशा/कार्या-१/ब-१/अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुक/२०२६ दि.२६.०२.२०२६ अन्वये मा.श्री.सुनिल थोरवे, अपर जिल्हाधिकारी रायगड यांना पिठासीन अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आलेली असुन, डॉ.श्री.रविंद्र शेळके, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रायगड-अलिबाग व डॉ.श्री.शीतल रसाळ, तहसिलदार (सर्वसाधारण) रायगड- अलिबाग यांना पिठासीन अधिकारी यांना सहाय्यक म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे.

मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-१/अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुक/२०२६ दि.०५.०३.२०२६ अन्वये सामान्य प्रशासन विभागातील काही कर्मचारी यांची दि.१२.०३.२०२६ रोजीच्या निवडणुक कामकाजासाठी आदेश काढण्यात आले आहे. तसेच मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडील दि.०५.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या दिवशी नियोजन भवन येथे संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, व्हीडीओग्राफर, वायरमन, जनरेटर सुविधा उपलब्ध करण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुंषगाने बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना याबाबतचे पत्र देऊन वायरमन, जनरेटर सुविधा, नियोजन भवनची स्वच्छता करणेबाबत अवगत केले आहे. तसेच तिन व्हीडीऑग्राफर व दोन फोटोग्राफर यांची नियुक्ती निवडणुक कामकाजाकरीता निवडणुक कामकाज संपेपर्यंत करण्यात आलेली आहे.

निवडणुक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निवडणुकीच्या ठिकाणी सुस्थितीत विज पुरवठा होणेकरीता महावितरण कंपनीला याबाबतचे पत्र देण्यात आलेले आहे. सभेकरीता पोलिस बंदोबस्ताचे पत्र मा.पिठासीन अधिकारी यांनी दिलेले आहे.

मा.पिठासिन अधिकारी यांनी गुरवार दि.०५.०३.२०२६ रोजी घेतलेल्या बैठकीत निवडणुक प्रक्रिया सुरळीतपार पाडण्याकरीता काही सुचना देऊन केलेल्या कामाचा आढावा घेतला.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुक सभेबाबत बांधकाम विभागाला दिलेल्या कामाची जाबाबदारी विभागाने व्यवस्थित पार पाडावी.

कार्यकारी अभियंता बांधकाम म्हणाले की, दि.११.०३.२०२६ रोजी नियोजन भवन साफ करण्याच्या सुचना सफाई कामगारांना देण्यात आलेल्या आहेत.

सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) म्हणाले की, निवडणुकीच्या दिवशी वैदयकीय पथक उपलब्ध करून देणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना याबाबतचे पत्र दिले आहे.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, आरोग्य विभागामार्फत एक वैदयकीय पथक दि.१२.०३.२०२६ रोजी सभा संपेपर्यत तेथे उपलब्ध करून दयावे.

मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुकीकरीता दि.१२.०३.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी निवडणुकीची तयारी करणेकरीता अन्य कोणत्याही विभागाची आवश्यक्त असल्यास त्याबाबत त्याविभागाकडून संबंधित कामकाज करून घ्यावे.

बांधकाम विभागकडून चालु असलेले मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती दालने व सभा बैठक कक्ष यांचे बांधकामाचे कामकाज संथ गतिने सुरू असल्याचे दिसुन येत आहे. कामाचा वेग वाढविण्यात यावा. तसेच कामाकाज जलद गतिने होण्यासाठी अतिरिक्त कामगार उपलब्ध करून सदरचे काम लवकर पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच वरसोली येथील सभागृह यापुढे विषय समित्यांच्या सभांसाठी उपलब्ध करून देण्याचे असल्याने सदर सभागृह सुस्थितीत ठेवणे, साऊंड सिस्टीम अदयावत करावी. व सभागृहात नवीन खुर्च्या ठेवण्यात याव्यात.

**आवश्यक कार्यवाही :- बांधकाम विभाग.**

**<u>विषय क्रमांक ०४ :-</u> मा.प्रशासक जि.प. यांचे अधिकारात येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयानां मंजूरी देणे.**

**<u>विषय क्रमांक ०४ (०१):-</u> ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबत...**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) म्हणाले की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती खालापूर यांनी ग्रुप ग्रामपंचायत शिरवली ता. खालापूर यांनी ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर ग्राम पंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) चे अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २१/११/२०२५ ठराव क्र. १२ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | जमा | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ६६७६५२३/- | ६०७३०१८/- | ६०३५०५/- |
| २०२३-२४ | १४०१२८२३/- | ११७०४३१४/- | २३०८५०९/- |
| २०२४-२५ | ८९२५३२३/- | ७९००१५८/- | १०२५१६५/- |
| | | एकुण | ३९३७१७९/- |

सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विना उत्पादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु. १३१२३९३/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु. २६२४७८६०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांनी

रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. अंदाजे खर्चाच्या ७५ टक्के रक्कम रु. ३७,५०,०००/- (रु. सदतीस लाख पन्नास हजार मात्र) रक्कम इतके कर्ज मंजुर करता येईल.

तरी ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कम रु. ३७,५०,०००/- (रु. सदतीस लाख पन्नास हजार मात्र) इतक्या कर्जास आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- ग्रामपंचायत विभाग**

**<u>विषय क्रमांक ०४ (०२):-</u> ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत हद्दित विविध विकास कामे करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबत...**

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) म्हणाले की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती खालापूर यांनी ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांनी ग्रामपंचायत हद्दित विकास कामे करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामे करणेकरीता रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) चे अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २०/०८/२०२५ ठराव क्र. ८३ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | जमा | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ४१२८२९२१.८९/- | ११७१५०४४.७२/- | २९५६७८७७.१७/- |
| २०२३-२४ | ५५९८३९९८.१७/- | २३०९२१४७.९२/- | ३२८९१८५०.२५/- |
| २०२४-२५ | ६२४८५४१६.२५/- | ४२९८२८२४.५०/- | १९५०२५९१.७५/- |
| | | एकुण | ८१९६२३१९.१७/- |

सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विना उप्तादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु. २७३२०७७३/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु. ५४६४१५४६०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांनी रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. अंदाजे खर्चाच्या ७५ टक्के रक्कम रु. २,५३,०१,६५२/- (रु. दोन कोटी त्रेपन्न लाख एक हजार सहाशे बावन्न मात्र) रक्कम इतके कर्ज मंजुर करता येईल.

तरी ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कम रु. २,५३,०१,६५२/- (रु. दोन कोटी त्रेपन्न लाख एक हजार सहाशे बावन्न मात्र) इतक्या कर्जास आजच्या सभेने मंजुरी दयावी.

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना

ग्रामपंचायत हद्दित विविध विकास कामे करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**आवश्यक कार्यवाही :- ग्रामपंचायत विभाग**

मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, आजच्या सभेत देणेंत आलेल्या सुचना प्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी व पुर्तता त्वरीत करणेंत यावी. तरी आजची सभा चांगल्या पध्दतीने पार पडली. तरी मी सर्वांचे आभार मानते व आजची सभा संपल्याचे जाहिर करते.

**(जालिंदर पठारे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**तथा सचिव**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**सही/-**
**(नेहा भोसले) भा.प्र.से**
**प्रशासक तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**दिनांक ०६/०३/२०२६ रोजी शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात जिल्हा परिषदेची नियमित प्रशासकी स्थायी समिती सभा घेणेंत आली, त्या सभेचे इतिवृत्त भाग-२**

| सभेची तारीख | प्रस्तावांचा विषय | प्रस्तावाचा मजकूर | प्रस्ताव सुचविणारा अनुमोदक यांचे नांव | दुरुस्ती कोणतीही असल्यास मजकुर | दिलेल्या मतांची संख्या | | | दुरुस्त्या मतदानानंतर अंतिम दुरुस्त्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सुचक | अनुमोदक | बाजूने | विरुध्द | तटस्थ | मजकूर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

**दि.०६/०३/२०२६ रोजीची नियमित प्रशासकी स्थायी समिती सभा शुक्रवार सकाळी ११.००० वाजता**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक:-०१**<br>जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढावा. | पूर्तता:-<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद सेस व जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजूर योजनांच्या प्रगतीचा व खर्चाचा आढाव घेण्यात आला. |
| **विषय क्र. ०२**<br>दि.०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | प्रशासकीय आदेश क्रमांक:- १२९<br>दि.०९.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आलेल्या नियमित प्रशासकीय स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात येत आहे.<br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थायी समिती<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर |
| **विषय क्रमांक:- ०३**<br>विभाग निहाय आढावा. | पूर्तता:-<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय स्थायी समिती सभेमध्ये विभाग निहाय आढावा घेण्यात आला. |
| **विषय क्रमांक:- ०४ मा.प्रशासक जि.प. यांचे अधिकारात येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयानां मंजूरी देणे.**<br>**विषय क्रमांक ०४ (०१):- ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबत...** | प्रशासकीय आदेश क्रमांक:- १३०<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती खालापूर यांनी ग्रुप ग्रामपंचायत शिरवली ता. खालापूर यांनी ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर ग्राम पंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) चे अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २१/११/२०२५ ठराव क्र. १२ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.<br>सन \| जमा \| खर्च \| शिल्लक<br>२०२२-२३ \| ६६७६५२३/- \| ६०७३०१८/- \| ६०३५०५/- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | १४०१२८२३/- | ११७०४३१४/- | २३०८५०९/- |
| २०२४-२५ | ८९२५३२३/- | ७९००१५८/- | १०२५१६५/- |
| | | एकुण | ३९३७१७९/- |

सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विना उत्पादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु. १३१२३९३/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु. २६२४७८६०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांनी रक्कम रु. ५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास लाख मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. अंदाजे खर्चाच्या ७५ टक्के रक्कम रु. ३७,५०,०००/- (रु. सदतीस लाख पन्नास हजार मात्र) रक्कम इतके कर्ज मंजुर करता येईल.

तरी ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कम रु. ३७,५०,०००/- (रु. सदतीस लाख पन्नास हजार मात्र) इतक्या कर्जास आजच्या सभेने मंजुरी दयावी.

तरी विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रुप ग्रामपंचायत शिरवली, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थायी समिती

प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्रमांक ०४ (०२):- ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत हद्दित विविध विकास कामे करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबत...**

प्रशासकीय आदेश क्रमांक:- १३१

गट विकास अधिकारी, पंचायत समिती खालापूर यांनी ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांनी ग्रामपंचायत हद्दित विकास कामे करणे करीता जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामे करणेकरीता रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) चे अंदाज पत्रक सादर केले आहे. सदर ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील अर्ज सादर केला असुन ग्रामपंचायतीने मासिक सभा दि. २०/०८/२०२५ ठराव क्र. ८३ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कर्ज घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची मागील तीन वर्षाचे आर्थिक स्थिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | जमा | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ४१२८२९२१.८९/- | ११७१५०४४.७२/- | २९५६७८७७.१७/- |
| २०२३-२४ | ५५९८३९९८.१७/- | २३०९२१४७.९२/- | ३२८९१८५०.२५/- |
| २०२४-२५ | ६२४८५४१६.२५/- | ४२९८२८२४.५०/- | १९५०२५९१.७५/- |
| | | एकुण | ८१९६२३१९.१७/- |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदर कामाचे विना उत्पादक कामांसाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) सादर केले असुन दि. २५/०८/२००० च्या अधिसुचनेनुसार विना उत्पादीत कामासाठी ३ आर्थिक वर्षाच्या शिल्लक रक्कमेच्या सरासरी रु. २७३२०७७३/- एवढी असुन त्या रक्कमेच्या २० पट रक्कम रु. ५४६४१५४६०/- एवढया रक्कमेचा कर्ज ग्रांमपंचायतीस देता येईल. मात्र ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांनी रक्कम रु. ३,३७,३५,५३६/- (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी सदतीस लाख पस्तीस हजार पाचशे छत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन जिल्हा ग्राम विकास निधीतुन कर्जाची मागणी केली आहे. अंदाजे खर्चाच्या ७५ टक्के रक्कम रु. २,५३,०१,६५२/- (रु. दोन कोटी त्रेपन्न लाख एक हजार सहाशे बावन्न मात्र) रक्कम इतके कर्ज मंजुर करता येईल.<br>तरी ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना जिल्हा ग्राम विकास निधी मधुन विकास कामांकरीता रक्कम रु. २,५३,०१,६५२/- (रु. दोन कोटी त्रेपन्न लाख एक हजार सहाशे बावन्न मात्र) इतक्या कर्जास आजच्या सभेने मंजुरी दयावी.<br>मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हणाले की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार तसेच प्रचलित नियमानुसार विभागाने कार्यवाही करण्याच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ग्रामपंचायत वडवळ, ता. खालापूर यांना ग्रामपंचायत हद्दित विविध विकास कामे करणेकरीता जिल्हा ग्राम विकास निधीमधून कर्ज मंजुरी बाबतच्या प्रस्तावास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br><br>सूचक : मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, स्थायी समिती<br>प्रशासकीय ठराव सर्वानुमते मंजूर | | | | | | | |

(जालिंदर पठारे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
तथा सचिव
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

सही/-
(नेहा भोसले) भा.प्र.से
प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग